# यवतमाळ जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठ्याचे स्वरूप: एक पाहणी

**डॉ. धीरज सु. कदम**

सहायक प्राध्यापक,

अर्थशास्त्र विभाग, रा.तु. म. नागपूर विद्यापीठ,

नागपूर.

**प्रस्तावना:**

इतर व्यवसायांप्रमाणे शेतीसुद्धा एक व्यवसाय असल्याने त्यासाठी कर्ज किंवा प्रत्यय (Credit) आवश्यक असते. शेतकऱ्यांना विशेषतः लहान शेतकऱ्यांना उत्पादनास¨बतच उपभोगासाठी देखील कर्जाची गरज असते. याशिवाय शेतीचा विकास, सुधारणा, अनुत्पादक व आकस्मिक कारणांसाठी सुद्धा कर्ज पुरवठ्याची गरज असते. आज देशातील विविध राज्यांमध्ये ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून येत आहेत, त्यामागे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे मुख्य कारण मानल्या जाते, शिवाय जिल्ह्याच्या समावेशी विकासासाठी कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वित्तीय समावेश ही आवश्यक अट आहे. या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या कर्जपुरवठयाच्या स्थितीचे अध्ययन हे प्रासंगिक ठरते. प्रस्तुत शोध निबंधात यवतमाळ जिल्ह्यातील 212 नमुना कुटुंबांच्या पाहणीद्वारे संकलिक प्राथमिक समकांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तद्वतच अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासनाचे विविध अहवाल आणि नाबार्ड द्वारे प्रकाशित *'स्टेट फोकस पेपर'* यातील दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

**यवतमाळ जिल्ह्यातील कृषि कर्ज पुरवठ्याची स्थिती**

शेती क्षेत्रात कर्ज पुरवठा करणाऱ्या स्रोतांचे विभाजन (अ) खाजगी स्रोत आणि (ब) संस्थात्मक स्रोत अशा दोन गटांमध्ये केले जाते. खाजगी स्रोतांकडून शेतकऱ्यांनी प्राप्त केलेल्या कर्जाची माहिती अचूक आणि सहजरित्या उपलब्ध होऊ शकत नाही परंतु संस्थात्मक स्रोतांद्वारे कृषि व संलग्न कार्यासाठी पुरविण्यात आलेल्या प्रत्ययाची माहिती उपलब्ध आहे. पुढील तक्त्यामध्ये वर्ष २०२१-२२ साठी यवतमाळ जिल्ह्यातील कृषि व संलग्न कार्यासाठी वितरीत एकूण कर्ज तसेच प्रति हेक्टर कर्ज/प्रत्ययाची माहिती विदर्भ व महाराष्ट्र व महाराष्ट्रातील सर्वाधिक कर्जपुरवठा होणाऱ्या तीन जिल्ह्यांच्या सरासरीशी तुलना करून दर्शविली आहे.

**तक्ता क्र. 1**

**कृषि व संलग्न कार्यासाठी वितरीत संस्थात्मक कर्ज पुरवठा (2021-22)**

| जिल्हा/विभाग/राज्य | कृषि व संबंधित क्षेत्रासाठी कर्ज प्रक्षेपण (लक्ष रु.) | वहीती धारण क्षेत्र (हेक्टर मध्ये)# | प्रति हेक्टर (रू.) |
|---|---|---|---|
| यवतमाळ | 300957 (2.7) | 903100 | 33,325 |
| विदर्भ | 2394372 (21.6) | 5430967 | 44,087 |
| महाराष्ट्र | 11064038 (100) | 20506432 | 53,954 |
| सर्वाधिक तीन जिल्ह्यांची सरासरी | 786122 (7.1) | 1208091 | 65,072 |

स्रोत : * State Focus Paper, NABARD, Maharashtra Regional Office, Pune, 2021-22
# Selected Indicators for Districts in Maharashtra and States in India 2020-21.

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन 2021-22 मध्ये यवतमाळ जिल्ह्यात संस्थागत स्रोतांद्वारे कृषि व संलग्न कार्यासाठी 3,00,957 लक्ष रुपये पत पैसा वितरीत करण्यात आला. जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्र 9,0,3100 हेक्टर असल्याने प्रतिहेक्टरी प्रक्षेपित पतपैसा 33,325 रुपये येत. विदर्भातील 11 जिल्ह्यात प्रति हेक्टर प्रक्षेपित पतपैशाची सरासरी 44,087 रुपये होती. तर महाराष्ट्रातील 33 जिल्ह्यांची (मुंबई वगळून) सरासरी विचारात घेता प्रतिहेक्टरी प्रत्यय प्रक्षेपण 53,954 रुपये होते. याच कालावधीत महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रति हेक्टर प्रक्षेपित प्रत्यय असणारे तीन जिल्हे अनुक्रमे अहमदनगर, पुणे आणि सातारा यांची सरासरी 65,072 रुपये येते. यावरून यवतमाळ जिल्ह्याच्या तुलनेत राज्यात सरासरीने 38 प्रतिशत प्रक्षेपित प्रतिहेक्टरी पत पुरवठा जास्त होता तर सर्वाधिक तीन जिल्ह्यांमध्ये तो 2 पटीने अधिक होता. ही वस्तुस्थिती विचारात घेता राज्य सरासरीच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संस्थागत स्रोतांद्वारे प्रतिहेक्टरी अल्प प्रमाणात पत पैसा उपलब्ध होतो. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे जिल्ह्यातील अल्प सिंचन होय. (याठिकाणी आपण नाबार्ड द्वारे अनुमानित प्रक्षेपित कर्जाचा विचार केला आहे, नाबार्डच्या याच अहवालात दर्शविल्या प्रमाणे विदर्भामध्ये प्रक्षेपित कर्ज अनुमानापैकी 2020-21 मध्ये प्रत्यक्षात ४८ टक्केच पीक कर्जाचे वितरण झाले होते.)

**धारण क्षेत्र, सिंचन सुविधांची उपलब्धता आणि कृषि कर्ज यांच्यातील सहसंबंधांचे विश्लेषण**

शेतकऱ्याला प्राप्त कृषि कर्जाच्या रक्कमेवर धारण क्षेत्राचा आकार तसेच सिंचन सुविधांच्या उपलब्धतेचा कित ी प्रमाणात प्रभाव पडू शकतो याचे विश्लेषण करण्यासाठी नमुना कुटुंबांच्या संदर्भात शेतकऱ्यांचे एकूण धारण क्षेत्र, सिंचित धारण क्षेत्र तसेच असिंचित धारण क्षेत्र व कृषि कर्जाची रक्कम यांच्यातील सहसंबंधांचे विश्लेषण पुढील तक्ता क्र. 2 द्वारे करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. 2**

**कृषि कर्जाची रक्कम आणि सिंचित, असिंचित तसेच एकूण धारण क्षेत्राचा आकार यांच्यातील सहसंबंध गुणांक**

| | **एकूण धारण क्षेत्र** | **असिंचित** | **सिंचित** | **कर्ज रक्कम** |
|---|---|---|---|---|
| **एकूण धारण क्षेत्र** | 1 | | | |
| **असिंचित** | 0.71 | 1 | | |
| **सिंचित** | 0.77 | 0.1177572 | 1 | |
| **कर्ज रक्कम** | **0.57** | **0.31** | **0.56** | 1 |

**स्रोत:** क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारित परिगणना

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नमुना कुटुंबांच्या धारणक्षेत्राचा आकार आणि कृषि कर्जाची रक्कम यांच्यातील सहसंबंध गुणांक 0.57 आहे. कृषि कर्जाची रक्कम आणि सिंचित धारणक्षेत्र यांच्यातील सहसंबंध गुणांक 0.56 आहे तर असिंचित धारण क्षेत्राचा आकार आणि कृषि कर्जाची रक्कम यांच्यातील सहसंबंध गुणांकाचे मूल्य 0.31 आहे. यावरून सिंचित धारण क्षेत्र आणि कृषि कर्ज यांच्यात मध्यम कोटीचा धनात्मक सहसंबंध आहे. तर असिंचित धारण क्षेत्र व कृषि कर्ज यांच्या दरम्यान निम्न कोटीचा धनात्मक संबंध आहे. यावरून शेतकऱ्यांच्या वित्तीय समावेशनासाठी धारण क्षेत्राचा आकार आणि सिंचन सुविधांची वाढ याचीही गरज प्रकर्षाने अधोरेखित होते.

**धारण क्षेत्रनिहाय कृषि कर्जाचे विभिन्न स्रोत व प्राप्त सरासरी कृषि कर्जाचे विष्लेषण**

शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या कर्जाच्या स्रोतांचे वर्गीकरण सामान्यतः संस्थात्मक स्रोत आणि असंस्थात्मक स्रोत याप्रकारे करण्यात येते. संस्थात्मक स्रोतांतर्गत सावकारद्वारे प्राप्त कर्ज सहजने मिळत असले तरी त्याचा व्याज दर अधिक असतो. त्यामुळे शेतकरी मुदतीत कर्ज परत न करू शकल्यास तो कर्जाच्या जाळ्यात अडकतो. शिवाय सावकारी कर्ज वसुलीची पद्धत जाचक व सक्तीची असल्यामुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो. याउलट संस्थात्मक कर्ज हे सुलभ व्याजदराने प्राप्त होत असून नापिकीच्या काळात कर्ज वसुलीची सक्ती न करता कर्जाचे पुर्नगठन देखील केल्या जात असल्याने सावकरी कर्जाचे पूर्णतः उच्चाटण होऊन पर्याप्त मात्रेत संस्थात्मक कर्ज पुरवठा शेतकऱ्यांना व्हावयास हवा. तथापि संस्थात्मक कर्ज वितरणातील तांत्रिकता व ते पर्याप्त मात्रेत उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना नाईलाजास्तव असंस्थात्मक सावकारी कर्जाकडे वळावे लागते. या संदर्भात जिल्ह्यातील नमुना शेतकरी कुटुंबांना वेगवेगळ्या धारणक्षेत्र-निहाय प्राप्त कर्जाच्या विन्नि स्रोतांचे व विश्लेषण पुढील तक्ता क्र. 3 व प्राप्त सरासरी कर्जाचे विश्लेषण आलेख क्र. 1 द्वारे करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. 3**

**धारण क्षेत्रनिहाय कृषि कर्ज स्रोतांचे वर्गीकरण**


| धारण क्षेत्र आकार (हेक्टर) | संस्थात्मक | | | असंस्थात्मक | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी पतसंस्था | व्यापारी अधिकोष | बचत गट | सावकार | नातेवाईक व मित्र | |
| **< 1** | 15 | 0 | 6 | 1 | 1 | 23 |
| **1 to 2** | 37 | 9 | 5 | 6 | 9 | 66 |
| **2 to4** | 40 | 13 | 6 | 3 | 5 | 67 |
| **4 to 10** | 30 | 13 | 2 | 5 | 2 | 52 |
| **10 <** | 11 | 3 | 3 | 1 | 1 | 19 |
| एकूण | 133 | 38 | 22 | 16 | 18 | 227 |
| | 193(85.4%) | | | 33(14.6%) | | |

**स्रोत:** क्षेत्रीय सर्वेक्षण

**आलेख क्र. 1**

**धारण क्षेत्रनिहाय प्राप्त सरासरी कर्ज**

(आकडे रु. मध्ये)




**स्रोत:** क्षेत्रीय सर्वेक्षण

जिल्ह्यातील 212 नमुना शेतकरी कुटुंबांपैकी 191 (90 प्रतिशत) कुटुंबांनी विभिन्न स्रोतांद्वारे कृषि कर्ज प्राप्त केले होते. कृषिकर्ज प्राप्त करणाऱ्या 191 शेतकऱ्यांपैकी 162 शेतकऱ्यांनी कुठल्यातरी फक्त एकाच स्रोताद्वारे कर्ज मिळवले होते तर 22 शेतकऱ्यांनी 2 आणि 7 शेतकऱ्यांनी 3 स्रोतांद्वारे कर्ज प्राप्त केले होते. त्यामुळे कर्ज प्रकरणांची एकूण संख्या 227 आलेली आहे. 227 कर्ज प्रकरणांपैकी संस्थात्मक आणि असंस्थात्मक असे ढ˙बळ वर्गीकरण विचारात घेता 193 म्हणजे 85.4 प्रतिशत कर्ज ही संस्थात्मक स्रोतांद्वारे घेण्यात आलेली होती, तर 33 म्हणजेच 14.6 प्रतिशत कर्जे ही असंस्थात्मक स्रोतांद्वारे घेण्यात आलेली होती. संस्थात्मक कर्जाचे 80 प्रतिशतपेक्षा अधिक प्रमाण ही निश्चितच चांगली बाब आहे. कर्ज स्रोतांचे सविस्तर वर्गीकरण विचारात घेता, सहकारी पतसंस्थांद्वारे 133 म्हणजे 58.6 प्रतिशत व्यापारी अधिकोषांकडून 38 म्हणजे 16.7 प्रतिशत, बचत गटांकडून 22 म्हणजे 9.7 प्रतिशत, सावकारांकाडून 16 म्हणजे 7 प्रतिशत तर नातेवाईक व मित्र यांच्याकडून 18 म्हणजे 8 प्रतिशत शेतकरी कुटुंबांनी कर्ज घेतले होते.

विविध स्रोतांद्वारे कृषि कर्ज प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांची धारणक्षेत्र निहाय स्थिती विचारात घेता, 1 हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र असणाऱ्या केवळ 78 प्रतिशत शेतकऱ्यांनी सरासरी रु. 16565


कर्ज प्राप्त केले होते, 1 ते 2 हेक्टर या दरम्यान धारणक्षेत्र असणाऱ्या 83 प्रतिशत शेतकऱ्यांनी सरासरी रु. 30274 घेतले होते, 2 ते 4 हेक्टर दरम्यान धारणक्षेत्र असणाऱ्या 93 प्रतिशत शेतकऱ्यांनी सरासरी रु. 57958, तर 4 ते 10 हेक्टर दरम्यान धारणक्षेत्र असणाऱ्या सर्वच (100 प्रतिशत) शेतकऱ्यांनी सरासरी रु. 1,21,535 कर्ज प्राप्त केले होते तर 10 हेक्टरपेक्षा जास्त धारणक्षेत्र असणाऱ्या सर्वच (100 प्रतिशत) शेतकऱ्यांची सरासरी रु. 2,03,461 चे कर्ज प्राप्त केले होते.

**नमुना कुटुंबांच्या कृषि कर्जाचा वेगवेगळ्या उद्देशासाठी सापेक्ष प्रतिशत वापर**

शेतकऱ्याला प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे चक्र हे दीर्घकालीन असून शेतीसाठीचा खर्च तसेच दैनंदिन उपभोगाचा खर्च नियमित करावा लागतो. प्राप्त उत्पन्नाचे दीर्घकालीन निय¨जन बहुतांशवेळी शक्य नसल्याने, कृषि कार्यासाठी शेतकरी जे कर्ज काढतो त्यातील काही हिस्सा नाईलाजास्तव त्याला दैनंदिन उपभोग, जीवनावश्यक गरजा वा इतर उद्देशासाठी वापरावा लागतो. आपल्या नमुना पाहणीमध्ये शेतकरी कुटुंबांनी जे कर्ज घेतले त्यांचा सरासरीने वेगवेगळ्या उद्देशासाठी झालेल्या वापराचे सापेक्ष विश्लेषण पुढील आकृतीद्वारे दर्शविण्यात आले आहे.

**आकृती क्र. 4**

**कृषि कर्जाचा वेगवेगळ्या उद्देशासाठी सापेक्ष प्रतिशत वापर**




**स्रोत:** क्षेत्रीय सर्वेक्षण

आकृतीत दर्शविल्याप्रमाणे नमुना शेतकऱ्यांनी प्राप्त केलेल्या एकूण कर्जापैकी सरासरी 65 प्रतिशत रक्कम शेतीच्या चालू कार्यासाठी उपय`गात आणली होती, तर बांधबंदिस्ती, विहिर, कुंपण यासारख्या संस्थात्मक कार्यासाठी सरासरी 12 प्रतिशत रक्कमेचा वापर करण्यात आला. त्यानंतर उपभोगासाठी सरासरी 9 प्रतिशत, शैक्षणिक कार्यासाठी सरासरी 6 प्रतिशत, वैद्यकीय उपचारासाठी 5 प्रतिशत तर सामाजिक व सांस्कृतिक (सण-उत्सव, लग्नकार्य, तेरवी इ.) कार्यासाठी सरासरी 3 प्रतिशत रक्कमेचा उपयोग करण्यात आल्याचे दिसून आले. यावरून जिल्ह्यातील नमुना कुटुंबा ंनी प्राप्त केलेल्या कर्जापैकी ढोबळमानाने 77 प्रतिशत वापर उत्पादक कार्यासाठी तर 33 प्रतिशत रक्कमेचा वापर अनुत्पादक कार्यासाठी होत असल्याचे दिसून येते.

**सारांश -**

जिल्ह्यातील नमुना शेतकरी कुटुंबांना वेगवेगळ्या स्रोतांपासून प्राप्त सरासरी उत्पन्नाचा विचार करता, शेतीपूरक व्यवसायांपासून मिळणारे उत्पन्न अत्यंत अल्प आहे. 1 हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र असणाऱ्यांना अन्य व्यवसायही करता आलेले नाहीत व 2 हेक्टर पर्यंत धारण क्षेत्र असणाऱ्यांना इतर स्रोतांपासून प्राप्त उत्पन्न जमेस धरूनही किमान जीवनमान प्राप्त करणे अशक्य असल्याचे स्पष्ट होते. यातून धारण क्षेत्राचा आकार वाढण्याची, तसेच एका बाजुला सिंचन सुविधांमध्ये तर दुसऱ्या बाजुला शेती पुरक व्यवसायांमध्ये वाढ घडून आणण्याची गरज प्रकर्षाने अधोरेखित होते.

जिल्ह्यातील नमुना कुटुंबांच्या उपभोग व्ययाच्या आधारे अर्ध्यापेक्षा अधिक कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रामध्ये सापेक्षतः दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण तर अधिक आहेच शिवाय दारिद्र्याची तीव्रतादेखील ग्रामीण क्षेत्रात सापेक्षतः अधिक आहे. विभिन्न प्रवर्गनिहाय दारिद्र्याचे प्रमाण पाहता, अनुक्रमे अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व मुस्लीम अल्पसंख्याकांमध्ये ते सरासरीपेक्षा अधिक आहे. यावरून शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रात व त्यातही अनुक्रमे अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व मुस्लीम अल्पसंख्याकांमध्ये विकास प्रक्रियेतील अपवर्जनाचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण क्षेत्रसापेक्ष शहरी क्षेत्रात दारिद्र्याचे प्रमाण कमी असले तरी उपभोग खर्च वितरणातील विषमता तेथे अधिक आहे. यावरून विकासाचे लाभ शहरी क्षेत्रात सापेक्षतः अधिक मिळत असले तरी त्याच्या वितरणात समानता नाही. ही सर्व निष्पत्ती आधारित निर्देशके यवतमाळ जिल्ह्यातील विकास प्रक्रिया समावेशी नसण्याकडे निर्देश करते.

वित्तीय समावेशनाच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना प्राप्त कृषि कर्जाची स्थिती लक्षात घेता, सिंचन सुविधा व धारण क्षेत्राच्या वाढत्या आकारानुसार शेतकऱ्यांना प्राप्त कृषि कर्जाची रक्कम देखील वाढत गेलेली दिसते. म्हणजेच जिल्ह्यातील कोरडवाहू, सीमांत व अल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्राप्त कृषि कर्जाच्या अनुषंगाने वित्तीय समावेशन अल्प आहे. यावरून शेतकऱ्यांच्या वित्तीय समावेशनासाठी धारण क्षेत्राचा आकार आणि सिंचन सुविधांच्या वाढीची निकड प्रकर्षाने अधोरेखित होते.

**संदर्भ:**


- GOI (2022). *State Focus Paper*, NABARD, Maharashtra Regional Office, Pune.
- GOI (2022). *"Selected Indicators for Districts in Maharashtra and States in India 2020-21",* Directorate of Economic and Statistics, Planning Department, Maharashtra State, India.
- कदम, धीरज सु. (2017). *"सर्वसमावेशक विकासाचे यवतमाळ जिल्ह्याच्या संदर्भात विश्लेषणात्मक अध्ययन"*, पीएच..डी. शोध प्रबंध, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.